**ग्रामीण कृषी मौसम सेवा**
भारत मौसम विभाग
प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन
(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

दिनांक : 23-05-2025

नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कळमेश्वर साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2025-05-23 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)

| हवामान घटक | 2025-05-24 | 2025-05-25 | 2025-05-26 | 2025-05-27 | 2025-05-28 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 5.5 | 9.2 | 5.8 | 4.0 | 0.2 |
| कमाल तापमान (अं.से) | 32.9 | 30.6 | 34.8 | 36.6 | 34.9 |
| किमान तापमान (अं.से) | 26.5 | 25.7 | 25.8 | 27.2 | 28.1 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 75 | 88 | 85 | 77 | 71 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 43 | 63 | 44 | 37 | 50 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 5.6 | 6.2 | 7.2 | 5.0 | 4.3 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 195 | 100 | 84 | 111 | 138 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 7 | 6 | 5 | 4 | 7 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, तालुक्यात, पुढील ५ दिवस दिनांक २४ ते २८ मे २०२५ दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता, • दिनांक २४, २५, २६, २७ व २८ मे २०२५ रोजी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. • विदर्भामध्ये पुढील २४ तासांमध्ये कमाल तापमानात २ ते ४ अंश सेल्सिअस ने वाढ होईल त्यानंतर फारसा बदल होणार नाही.

## कृषि सल्ला:

• जमिनीतील उपलब्ध ओलाव्याचा फायदा घेत कापणी झालेल्या शेतात खोल नांगरणी करणे उपयुक्त ठरते, त्यामुळे जमिनीत सुप्त अवस्थेत असलेले कीटक, अळी किंवा कोश अजिबात सूर्यप्रकाशात व पक्ष्यांच्या शिकारीसाठी उघडे पडतात. • पीक अवशेष शेतात जाळणे टाळावे; त्याऐवजी ते कंपोस्ट / सेंद्रिय खत तयार करण्यासाठी वापरावेत. तसेच, उन्हाळ्यात लागणाऱ्या आगींचे प्रमाण कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी. • आगामी खरीप हंगामात जमिनीतील ओलावा टिकवण्यासाठी, खरीप हंगामासाठी तयारी म्हणून जमिनीची नांगरणी ही समतल रेषेवर आणि उताराच्या विरुद्ध दिशेने करावी. • शेतकरी बांधवांद्वारा पशुधनासाठी शेतात उघड्यावर साठवलेल्या कडबा, कुटार, काड इत्यादीचे संभाव्य पावसामुळे नुकसान होऊ शकते अथवा त्याची प्रत व गुणवत्ता ढासळू शकते त्यामुळे शेतात उघड्यावर साठवलेल्या कडबा, कुटार, काड इत्यादी चारा ताडपत्री अथवा प्लास्टिक शीट च्या सहाय्याने झाकून ठेवावा. वादळी वाऱ्यामुळे झाकून ठेवलेल्या ताडपत्र्या उडून जाऊ शकतात त्यामुळे ताडपत्री वर योग्य त्या वजनाचे दगड अथवा इतर अधिक वजनाच्या वस्तू ठेवाव्या. चारा साठवताना शेतात उंच वाट्यावर साठवावा. उपलब्धतेनुसार जनावरांचा चारा हा गोठा किंवा शेड मध्ये साठवावा. • संभाव्य पावसाचा अंदाज लक्षात घेता, परिपक्व अवस्थेतील उन्हाळी मुग, भुईमुग व इत्यादी पिकाची कापणी व मळणी ची कामे लवकरात लवकर उरकून घेण्यास प्राधान्य द्यावे. कापणी केलेला शेतमाल कोरड्या व सुरक्षित ठिकाणी साठवावा. मळणी ची कामे शक्य नसल्यास कापणी केलेला शेतमाल प्लास्टीक शीट किंवा ताडपत्रीच्या सहाय्याने झाकून ठेवावा. • हंगामी पिके, फळबागा, भाजीपाला पिकामध्ये आंतरमशागतीची कामे (डवरणी, खुरपणी इत्यादी.), कीड व रोग व्यवस्थापनासाठी कृषी रसायनांची फवारणीची कामे व उभ्या पिकामध्ये खते देण्याची कामे पुढील ३-४ दिवस पुढे ढकलावी. • मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

| |
|---|
| जिल्ह्यातील मागील घटनांचा संदर्भ लक्षात घेता मेघगर्जनेच्या वेळी पळस, कडूनिंब तसेच ईतर कोणत्याही झाडाखाली आश्रय टाळावा. • वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता बाजारायोग्य फळे तसेच भाजीपाला पिकाची काढणी करून विक्री करावी. फळझाडांना बाबूच्या सहाय्याने आधार द्यावा. • गोठ्याच्या दुरुस्तीची कामे त्वरित करून घ्यावी. • कृषी उत्पन्न बाजार समिती अथवा खुल्या बाजारामध्ये शेतकरी बांधवाद्वारा विक्री साठी आणलेल्या शेतमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतमाल हा उघड्यावर साठवणे टाळावे, शेतमाल हा शेड मध्येच साठवावा. |

### संक्षिप्त संदेश सल्ला:

| |
|---|
| शेतात काम करताना मेघगर्जनेची चाहूल लागताच तात्काळ सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. |

### पिक निहाय सल्ला:

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कपाशी | • मागील हंगामातील पीक उरलेले खोड व झाडांचे भाग शेतातून स्वच्छ करून टाकावेत. उखडलेले कपाशीचे खोड शेताच्या बांधांवर साठवू नयेत. मागील पिढीतील गुलाबी बोंडअळी ही बाधित बोंडे, खोड किंवा मातीमध्ये सुप्तावस्थेत शिरते. त्यामुळे अशा बाधित अवशेषांचे त्वरित नाश करावा, जेणेकरून गुलाबी बोंडअळीचा जीवनचक्र खंडित करता येईल. • मागील हंगामात गुलाबी बोंडअळीचा प्रादुर्भाव जास्त असलेल्या शेतांमध्ये पीक पद्धतीत फेरबदल (पिक फेरपालट) करावी, जेणेकरून गुलाबी बोंडअळीचा जीवनचक्र तुटेल. • कपाशीचे पावसाळ्यापूर्वी (पूर्वमान्सून) पेरणी करणे टाळावे. कारण लवकर पेरलेले पीक लवकरच फूल व पात्या तयार होतात आणि मागील हंगामातील सुप्त अवस्थेतील गुलाबी बोंडअळीचे पतंग त्यावर अंडी घालतात. त्यामुळे अशा पिकातून नव्या हंगामातील पहिली पिढी तयार होते व वेळेवर पेरलेल्या पिकावरही प्रादुर्भाव वाढतो. |
| भुईमूग | • परिपक्व अवस्थेतील उन्हाळी भुईमुग पिकाची काढणी व मळणी करून घ्यावी. • काढणी केलेला भुईमुग पिकाचा शेतमाल कोरड्या व सुरक्षित साठवावा. संभाव्य पावसामुळे काढणी केलेल्या शेतमालाचे नुकसान यासाठी उपाययोजना कराव्या. |

### फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| कांदा | • परिपक्व अवस्थेतील कांदा पिकाची काढणी करावी. • काढणी केलेला कांदा कोरड्या व सुरक्षित साठवावा. संभाव्य पावसामुळे काढणी केलेल्या शेतमालाचे नुकसान यासाठी उपाययोजना कराव्या. |
| लसून | • परिपक्व अवस्थेतील लसून पिकाची काढणी करावी. • काढणी केलेला कांदा कोरड्या व सुरक्षित साठवावा. संभाव्य पावसामुळे काढणी केलेल्या शेतमालाचे नुकसान यासाठी उपाययोजना कराव्या. |
| आंबा | • बाजारायोग्य फळांची काढणी करून विक्री करावी. वादळी वाऱ्यामुळे झाडावरील फळे गळण्याची शक्यता असल्याने झाडाखाली प्लास्टीक शीट अंथरून फळे गळल्यास फळांची प्रतवारी करून चांगल्या प्रतीच्या फळांची विक्री करावी. |
| संत्रा | • फ्रूटलेट ब्लाईट : फळावरील काळे डाग यांना फ्रूटलेट ब्लाइट' असे संबोधले जाते. कोळी कीड किंवा फुलकिडे यांच्या प्रादुर्भावामुळे फळांना जखमा होतात, त्या जखमांमधून पॅन्टोआ अॅनानाटिस या जिवाणूचे संक्रमण होऊन फळांवर काळे डाग पडतात. • लक्षणे : प्रभावित लहान फळांवरील आवरणावर खोलगट अनियमित आकाराचे गडद काळे किंवा तपकिरी डाग पडतात. सदर डाग हे हात लावल्यास तेलकट भासतात. छोट्या काळ्या डागापासून सुरूवात होऊन नंतर संपूर्ण फळ काळे पडते परिणामी बरेचदा फळे खाली पडतात. • व्यवस्थापन : काळे डाग पडून होणाऱ्या लहान फळांची गळ कमी करण्यासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड ५०% डब्लुपी २५ ग्रॅम १० लिटर पाणी या मिश्रणाची फवारणी करावी. • मध्यम प्रकारच्या जमिनीतील मंत्रा बागेस मृग बहार घेण्याकरिता २५ एप्रिल पासून १५ जून पर्यंत ५० दिवसांचा पाण्याचा ताण • आंबिया बहाराची फळे असलेल्या संत्रा बागेस नियमित ओलीत करावे. याकरिता ठिचक सिंचन पद्धत वापराची. आव्यात पाला पाचोळा, गव्हांडा याचे ५ इंच जाड आच्छादन करावे. त्यामुळे फळगळ कमी होईल. • हस्त बहाराचे लिंबू फळांची काढणी करून प्रतवारी करून विक्री करावी. |

### पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| बकरा किंवा बकरी | मेघगर्जना, विजांचा कडकडाट व वादळी वाऱ्याचा अंदाज लक्षात घेता पशुधनास उघड्यावर चराई क्षेत्रावर चरावयास सोडणे टाळावे. जनावराना गोठया मध्येच चारा व पाण्याची व्यवस्था करावी. |